(SJIF) Impact Factor-7.675 ISSN-2278-9308

# B.Aadhar


Peer-Reviewed & Refreed Indexed


Multidisciplinary International Research Journal

## August-2021

SPECIAL ISSUE CCCVIII (308)





Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor:
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

Executive Editor :
Dr.Sanjay J. Kothari
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe ArtsComm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

**The Journal is indexed in:**

Scientific Journal Impact Factor (SJIF)
Cosmos Impact Factor (CIF)
International Impact Factor Services (IIFS)

**Impact Factor – 7.675** **ISSN – 2278-9308**

# B.Aadhar

## Peer-Reviewed & Refereed Indexed

### Multidisciplinary International Research Journal

## August-2021

**ISSUE No- (CCCVIII) 308**

## Sciences, Social Sciences, Commerce, Education, Language & Law

**Prof. Virag.S.Gawande**
Chief Editor
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

**Dr.Dinesh W.Nichit**
Editor
Principal,
Sant Gadge Maharaj Art's Comm,Sci Collage, Walgaon.Dist. Amravati.

**Dr.Sanjay J. Kothari**
Head, Deptt. of Economics, G.S.Tompe Arts Comm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

## Aadhar International Publication

For Details Visit To : www.aadharsocial.com

© All rights reserved with the authors & publisher

| | | |
|---|---|---|
| | डॉ. लिलाधर डी. खरपुरिये | |
| 22 | भारतातील नियोजन प्रक्रियेचे विकेंद्रीकरण प्रा. डॉ. एन.बी मठपती | 99 |
| 23 | भारूड : विषयातील व्यापकता प्रा. डॉ. राजेंद्र हावरे | 102 |
| 24 | नागपूर शहरातील शिक्षण महाविद्यालयातील इंग्रजी अध्यापन पद्धती असणाऱ्या विद्यार्थी आणि विद्यार्थीनींच्या अध्यापन क्षमतांचा तुलनात्मक अभ्यास डॉ. शिरीन शेख | 106 |
| 25 | विदर्भातील कालसापेक्ष कापूस पिक केंद्रीकरण डॉ. सुषमा ल. दामोदरे /मुकेश रा. खारकर | 111 |
| 26 | संत साहित्यातील ग्रामीण जाणिवा प्रा. डॉ. अजय कृ. खडसे | 117 |
| 27 | भातगिरणी व्यवसायाचे ऐतिहासिक समिश्रण व श्रमाचे बदलते स्वरूप डॉ. एस.एच. भैरम | 121 |
| 28 | महिलाएँ और मानवाधिकार डॉ. मोहिनी दहिया | 125 |
| 29 | लिंग समानता द्वारे महिला सक्षमीकरण प्रवीण एन. गेडाम /डॉ.हृषीकेश दलाई | 128 |
| 30 | मधु कांकरिया के कहानियों में सामाजिक एवं सांस्कृतिक सम्वेदना डॉ.ज्ञानेष्वर गणपतराव रानभरे | 133 |
| 31 | नोकरदार स्त्री आणि गृहव्यवस्थापन प्रा. सौ. सुषमा जाजु | 137 |
| 32 | Journey of Woman as Human Being: With Special Reference to Indian Society. **Mr. Baban Tukaramji Bhalerao** | 141 |
| 33 | महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे अस्पृश्यता निवारण्याचे विचार प्रा.राजगुरू गौतम धनाजी | 145 |
| 34 | अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील मार्क्सवाद व आंबेडकरवाद प्रा.डॉ.माधव केरबा वाघमारे | 149 |
| 35 | खान्देशातील माळी जातीचा कौटूंबिक व सामाजिक अभ्यास **श्री. संदिप अशोक भदाणे / प्रा. डॉ. मनिषा अनिल कचवे** | 152 |
| 36 | नागपूर शहरातील माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमधील चिंता व भितीचा गुणसंपादनावर होणारा परिणाम अभ्यासणे डॉ. अविनाश देशकर | 156 |
| 36 | राष्ट्रसंतांची विचारप्रवर्तक सामुदायिक प्रार्थना प्रा. डॉ. पी. आर. जाधव | 165 |
| 37 | Income And Expenditure Pattern Of Gadchiroli Municipal Council **Dr. Madhuri Kishanrao Tanurkar** | 168 |
| 38 | विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येची स्थिती डॉ. श्रीहरी मा. सानप | 181 |
| 39 | मानवी हक्क आणि भारतिय राज्यघटनेतील शिक्षणाचा मुलभूत अधिकार जगदीश दौलतराव चिंचोळकर | 186 |

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 308 (CCCVIII )
ISSN : 2278-9308
August, 2021

# राष्ट्रसंतांची विचारप्रवर्तक सामुदायिक प्रार्थना

प्रा. डॉ. पी. आर. जाधव
स्व. दत्तात्रेय पुसदकर कला महाविद्यालय, नांदगाव पेठ, ता. जि. अमरावती

महाराष्ट्राला फार मोठी संत परंपरा लाभली आहे. संत ज्ञानेश्वरांपासून ते अलिकडच्या काळातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांपर्यंत सर्व संतांनी केलेले कार्य अत्यंत मौलिक आणि समाजाभिमुख आहे. संतांचे विचार त्यांच्या काळात जसे प्रेरणादायी होते तसेच आजच्या समाजाला ते दिशादर्शक ठरणारे आहे. संतांनी आपल्या विचारांच्या माध्यमातून आध्यात्मिक समतेबरोबर समाज परिवर्तनाची भूमिका घेऊन समाजामध्ये परिवर्तन घडवून आणले. संत साहित्यामध्ये राष्ट्रसंतांच्या विचाराचा वेध घेतला असता राष्ट्रसंतांची भूमिका ही सतत समाज सुधारणेची राहिली आहे. १९०९ रोजी जन्मलेल्या माणिक बंडूजी ब्रम्हभट्ट यांनी आपल्या कृती आणि उक्तीतून समाजोध्दाराचे, भारतोध्दाराचे कार्य केले. आपल्या विचाराने आणि कार्याने ते भारतभर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणून ओळखले जातात. राष्ट्रसंतांनी 'गुरुकुंज आश्रमाची' स्थापना करून त्या माध्यमातून समाजपरिवर्तन घडवून आणले. राष्ट्रसंतांचे कार्य हे आजही समाजाला तेवढेच दिशादर्शक आहे यात शंका नाही.

राष्ट्रसंत यांच्या सर्वात्मक देवाला उद्देशून केलेल्या प्रार्थना वैयक्तिक मोक्षासाठी नाहीत. जन्म मरणाच्या फेऱ्यातून मुक्त होण्यासाठी नाहीत. त्यांचे प्रयोजन पूर्णपणे ऐहिक स्वरूपाचे आहे. मानव जातीच ऐहिक कल्याण त्यांना अभिप्रेत आहे. ते साधण्यासाठी माणसाने झटावे यासाठी आहे. देवधर्माच्या अनुषंगाने येणारे यज्ञयाग, कर्मकांड, देवाची स्तुतिस्तोत्रे यांना त्यांच्या प्रार्थनांमध्ये स्थान नाही. त्या धर्मनिरपेक्ष असून सबंध मानव समाजाच्या अभ्युदयासाठी लिहिल्या आहेत. त्याला कलियुगातील उपासना म्हणतात.

राष्ट्रसंतांनी आपल्या सामुदायिक प्रार्थनेच्या माध्यमातून मानवी जीवन समृद्ध होण्याकरिता कृतिशील उपासनेला अतिशय महत्त्व दिले आहे. प्रार्थनेतून माणसाच्या कार्यशक्तीला, सक्रियतेला उर्जा मिळते. ही त्यांची प्रार्थनेमागील महत्त्वाची भूमिका आहे. 'प्रार्थना' या शब्दातून जो कार्यध्वनी उमटतो तो मानवी समाजाच्या सर्वांग उन्नतीचा ध्वनी होय.

राष्ट्रसंतांनी आपल्या सामुदायिक प्रार्थनेच्या माध्यमातून मानवी कल्याणासाठीचे तत्त्वज्ञान मांडले आहे. या जगातील सर्व जातिधर्म, पंथांच्या लोकांनी कोणत्याही आधारावर परस्परांमध्ये भेदभाव न करता गुण्यागोविंदाने नांदावे यासाठी राष्ट्रसंतांनी सामुदायिक प्रार्थना लिहिली. मानवतावादी धर्म विकसित करून सदभावनेचा विचार प्रत्येकाच्या अंगी रुजावा, त्यांचा निराशावादी दृष्टिकोण बदलून सकारात्मक प्रवृत्ती वाढीस लागावी या उद्देशातून राष्ट्रसंतांनी सामुदायिक प्रार्थनेवर भर दिल्याचे जाणवते. प्रस्तुत निबंधातून राष्ट्रसंतांच्या सामुदायिक प्रार्थनेमधील समाप्रबोधनपर विचारांचा शोध घेण्याचा प्रयत्नातून केला आहे.

"सर्व धर्माचा समन्वय विश्वशांतीचा उपाय ।
लोकसुधारणेचे विद्यालय सामुदायिक प्रार्थना ।। १।।"

राष्ट्रसंतांनी प्रारंभी आपल्य सामुदायिक प्रार्थनेचे उद्दिष्ट काय आहे हे यातून सांगितले आहे. विश्वशांती राखायची असेल तर सर्व धर्मांचा समन्वय राखणे अत्यंत महत्त्वाचा आहे. मानवा-मानवातील भेदभाव गळून पडावा या विचारांना ते सामुदायिक प्रार्थनेत अधिक महत्त्व् देतात. त्याहीपुढे जाऊन राष्ट्रसंतांना धर्मविरहित समाजनिर्मिती करावयाची असल्याचे दिसून येते. यासाठी ते ग्रामगीतेतून म्हणतात,

"सर्व विश्वाचा एकचि देव । त्याची मुले सर्वचि जीव ।

जरी वेगवेगळे दिले नाव । तरी भाव हाचि त्यांचा ।। 15।।"(1)

अशी संत ज्ञानेश्वरांनी मांडलेली 'हे विश्वचि माझे घर' ही संल्कपना लोकांमध्ये रुजविण्याचा प्रयत्न राष्ट्रसंत तळमळीने करताना दिसतात. विश्वाचा देव एकच आहे, त्याला वेगवेगळी नावे दिली असली ती मूलत: तो एकच आहे, तो भिन्न भिन्न नाही. ही भूमिका मांडताना राष्ट्रसंतांच्या विश्वव्यापक संकल्पनेची प्रचीती येते. "राष्ट्रसंतांची ग्रामगीता म्हणजे ग्रामनाथाच्या सर्वांगीण उत्कर्षाला उभारी देणारी भगवदगीता आहे"(2) असे कविवर्य विठठल वाघ म्हणतात.

"जगासि सुखी, उन्नत करावे । हेचि त्या जगन्नियंत्या रुचावे ।
मम धर्माचे रुप याहूनि असावे । भिन्न कसे ? ।। २२।।"

या विचारातून राष्ट्रसंतांच्या सामुदायिक प्रार्थनेचा उद्देश स्पष्ट होतो. जग जर, एकाच देवाने निर्माण केले असेल तर वेगवेगळे धर्म, पंथ का मानायचे? राहणी भिन्न असेल, भाषा वेगळया असतील, भोजन व्यवस्था वेगळी असेल मात्र या सर्वांमध्ये मानवपणा, एक समान सूत्र मांडताना राष्ट्रसंत म्हणतात,

"भिन्न राहणी, भिन्न उपासना, । म्हणोनि का पारखा मानवपणा ।
जरी भिन्न पध्दतीनी केली प्रार्थना । तरी काय झाले ।।37।।"

"आमचा व्यवहार हा परमार्थमय असावा... हेच सामुदायिक प्रार्थना शिकवते... म्हणजे मी लोकांना फसवले तर चालते, लोकांची लुबाडणूक केली तर चालते पण कोणी मला फसवू नये अशी स्वार्थभावना असू नये. नेहमी कोणाचं वाईट तरी होऊ नये, याची काळजी आपण घ्यावी... समाजाच्या भौतिक उन्नतीसाठी आपल्या सामुदायिक प्रार्थनेमधून केली आहे. ते सर्व गुण माणसाच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी देखील आवश्यक आहे."(3) हे मत पूर्णपणे मान्य होण्यासारखे आहे. कारण राष्ट्रसंतांनी ज्या वर्तनाची, व्यवहारांची, सदगुणांची अपेक्षा केली तशीच ती माणसाची आध्यात्मिक उन्नती करणारी आहे.

विठठल वाघ असे म्हणतात, "त्यांनी ग्रामगीतेला भगवदगीता म्हटले आहे ते माझ्या मते बरोबर नाही. कारण ग्रामगीतेच्या आशयाची व्याप्ती खूप मोठी असून ती सबंध मानवजातीच्या उत्थानासाठी आहे. ग्रामगीतेचे नाते भगवदगीतेपेक्षा मला ज्ञानेश्वरांच्या पसायदान या प्रार्थनिशी अधिक आहे असे वाटते."(4) भगवदगीतेमध्ये चार्तुवर्ण्याचे समर्थन आहे. "चातुर्वण्य मया सृष्टम् गुणकर्मविभागश:"(5) असे गीतेमध्ये श्रीकृष्णांनी म्हटले आहे.

मानव जातीला एकत्र आणायचे असेल तर राष्ट्रसंत प्रेमाचा मार्ग स्वीकारतात. प्रेमाच्या माध्यमातून जगामध्ये सुख-शांती निर्माण करता येते. यावर राष्ट्रसंतांचा गाढ विश्वास आहे. राष्ट्रसंतांनी सामुदायिक प्रार्थनेच्या माध्यमातून धर्म आणि ईश्वर हया दोन्ही संकल्पना स्पष्ट केल्या आहेत. याविषयी ते म्हणतात,

"आपणऐसे सर्वांचे सुख, दु:ख । जाणोनि वागावे उपकारक ।
सर्व धर्मी हाचि आदेश एक । दुमदुमताहे ।।२३।।"

जगातील प्रत्येक धर्माचे तत्वज्ञान हे मानवी कल्याणाच्या हितासाठीच आहे. प्रत्येक धर्मने आपल्या धर्मग्रंथामधून मानवी जीवनाच्या उन्नतीचे तत्वज्ञान मांडले आहे. आज मात्र देवधर्माच्या नावाने मानवी जीवनात अस्थिरता निर्माण केली जात आहे. अशा अस्थिरतेच्या काळात राष्ट्रसंतांनी निर्माण केलेला उपदेश बहुमोलाचा ठरतो. धर्माच्या बाबतीत राष्ट्रसंत जसे स्पष्टपणे सांगतात. तसेच ईश्वरही एकच आहे ही भूमिकाही ते समाजाला पटवून देतात.

"अल्ला, गॉड, अर्हत, देव । अहूरमज्द, निर्वाण, शिव ।
परमेश्वरासि ठेवा नाव । एक गुरुदेव तोचि माझा ।।२१।।"

ईश्वराविषयी राष्ट्रसंतांचे वरील विचार जगात एकोपा व सलोखा निर्माण करण्याचे अत्यंत महत्त्वाचे ठरतात. राष्ट्रसंतांनी आपल्या सामुदायिक प्रार्थनेच्या माध्यमातून मानवाच्या अंगी विश्वबंधुत्वाची ओढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला. अखिल विश्वाचा मानव सुखी, समृध्द, ज्ञानसंपन्न व्हावा ही भूमिका राष्ट्रसंतांची आहे. सर्व धर्मातील लोकांनी प्रेमपूर्वक सहकार्याच्या भूमिकेतून क्रूर प्रवृत्तींना कायमचे नष्ट केले पाहिजे. त्यासाठी आपले अंत:करण शुध्द असावे असा विचार प्रार्थनेच्या माध्यमातून ते मांडतात.

राष्ट्रसंतांनी सामुदायिक प्रार्थना लिहिताना मानवाच्या आणि देशाच्या व्यापक उध्दाराचा एक विशालकाय दृष्टिकोण नजरेसमोर ठेवलेला होता. राष्ट्रसंतांची सामुदायिक प्रार्थना म्हणजे मानवाला मानव बनून स्वत:बरोबरच जगाचे कल्याण साधावे यासाठी केलेला ग्रामवेद होय असे म्हटल्यास अतिशोयक्ती ठरणार नाही. आधुनिक काळात राष्ट्रसंतांच्या सामुदायिक प्रार्थनेमधील विचार हे समाज परिवर्तनासाठी अत्यंत उपयुक्त आहेत. जाती धर्माच्या पलिकडे जाऊन केवळ मानवता धर्म हाच खरा धर्म आहे. ही प्रार्थनेमागील राष्ट्रसंतांची खरी तळमळ आहे. राष्ट्रसंतांच्या या विचारांना मानव जातीने अंगीकार केल्यास जग सुखी व समृध्द व्हायला वेळ लागणार नाही.

जातीयतेला खतपाणी घालणारे निवडणुकांचे राजकारण, धार्मिक कट्टरता आज अफगाणीस्तानमध्ये दिसून येणारे अमानुष, मानवी कौर्य हे सगळे आपल्या दैनंदिन जीवनात माणसे अनुभवत आहेत. या दुरितातून मुक्तता मिळायची असेल तर राष्ट्रसंतांच्या सामुदायिक प्रार्थनेचे पठन व त्यानुसार आचरण अत्यंत आवश्यक आहे.

मानवाने अंगी विश्वबंधुत्वाची ओढ निर्माण करण्याचा प्रयत्न करावा. अखिल विश्वाचा मानव सुखी, समृध्द, ज्ञानसंपन्न व्हावा, ही भूमिका राष्ट्रसंतांची आहे. सर्व धर्मातील लोकांनी प्रेमपूर्वक सहकार्याच्या भूमिकेतून क्रूर प्रवृत्तीला कायमचे नष्ट केले पाहिजे त्यासाठी आपले अंत:करण शुध्द असावे असा विचार प्रार्थनेच्या माध्यमातून ते मांडतात. ग्रामगीतेमागे तुकडोजी महाराजांचे अवघे चरित्र उभे आहे. 'बोले तैसा चाले', असे तुकडोजी महाराजांचे व्यक्तिमत्व होते. लोकहितैपी आणि नि:स्वार्थी डॉ. अशोक कामत यांनी "राष्ट्रसंत एक निर्लिप्त मृत्युपत्र या ग्रंथांच्या परिशिष्ट दोन मध्ये उदधृत केलेले तुकडोजींचे मृत्युपत्र वाचावयास हवे."(5)

राष्ट्रसंतांनी सामुदायिक प्रार्थना लिहिताना मानवाच्या आणि देशाच्या व्यापक उध्दाराचा एक विशालकाय दृष्टिकोण नजरेसमोर ठेवलेला होता. सामुदायिक प्रार्थना म्हणजे मानवाला मानव बनून स्वत:बरोबर जगाच्या कल्याणसाठीचा ग्रामवेद होय असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही. आधुनिक काळात राष्ट्रसंतांच्या सामुदायिक प्रार्थनेमधील विचार हे समाजपरिवर्तनासाठी अत्यंत उपयुक्त आहेत. जाती धर्माच्या पलिकडे जाऊन केवळ मानवता हाच खरा धर्म आहे. ही प्रार्थनेमागील राष्ट्रसंतांची खरी तळमळ आहे. राष्ट्रसंतांच्या या विचारांना मानव जातीने अंगीकार केल्यास जग सुखी व समृध्द व्हायला वेळ लागणार नाही.

आधारभूत संदर्भ ग्रंथ –

१) अध्याय 28 वा 'प्रार्थना व विश्वधर्म' - राजगुरू माधव, ग्रामगीता संकलन/संपादन विशेपाधिकारी मराठी विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ पुणे – 4, 1955 च्या प्रथमावृत्तीचे मूळ संपादक – स्व. सुदाम सावरकर.
२) श्री. तुकडोजींचे गाव – प्राचार्य विठ्ठल वाघ, संपादक – भगत प्राचार्य रा. तु., राष्ट्रसंत तुकडोजी महाराज गौरव ग्रंथ - चैतन्य प्रकाशन कोल्हापूर 012 – पृष्ठ क्र. 153.
३) रक्षक ज्ञानेश्वर दुर्गादास – 'राष्ट्रसंतांची जनचेतना सामुदायिक प्रार्थना' नाथे पब्लिकेशन लिमिटेड नागपूर 24 पृष्ठ क्र. 64.
४) 'भगवदगीता' प्रकाशन – गोविंद भवन कार्यालय गीताप्रेस, गोरखपूर अध्याय 4 था पृष्ठ क्र. 22.
५) कामत डॉ. अशोक 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विरचित ।।ग्रामगीता सुबोध निरूपण।।' गुरूकुल प्रतिष्ठान पुणे 004 पृष्ठ क्र. 449.